सडक अर्जुनी तालुक्याचे लोकप्रिय दैनिक

तांदूळनगरी

सत्याचा आवाज, जनतेचा विश्वास

दिनांक:
25 ऑगस्ट 2026
मंगळवार

फायर ब्रिगेड कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन

सायबर जनजागृती कार्यक्रमात ऑनलाईन फसवणुकीबाबत दिली माहिती

तांदूळनगरी | नागपूर :

क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत तसेच शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने फायर ब्रिगेड कार्यालय, कॉटन मार्केट येथे ९९ ऑगस्ट रोजी सायबर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, नागपूर येथील विद्यार्थी कुणाल मेश्राम आणि ऋतुजा गिरी यांनी कार्यक्रमाचे सादरीकरण केले. त्यांनी उपस्थित कर्मचारी व अधिकाऱ्यांना वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देत ऑनलाईन फसवणुकीचे विविध प्रकार आणि त्यापासून बचावाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.



फिशिंग, दूरध्वनीद्वारे फसवणूक, संदेशाद्वारे फसवणूक, बनावट संकेतस्थळे व दुवे, ऑनलाईन आर्थिक फसवणूक यांसह विविध सायबर गुन्ह्यांच्या पद्धतींबाबत उपस्थितांना सावध करण्यात आले. संशयास्पद संदेश, दूरध्वनी किंवा दुव्यांना प्रतिसाद न देणे, गोपनीय माहिती कुणालाही न देणे आणि डिजिटल व्यवहार करताना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

▶ कार्यक्रमाला फायर ब्रिगेड कार्यालयातील कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपस्थितांनी सायबर सुरक्षेबाबत आवश्यक खबरदारी घेण्याचा संकल्प केला.

अशाच ब्रेकिंग बातम्या व ताज्या घडामोडी जाणून घेण्यासाठी
आपल्या व्हॉट्सॲपमध्ये 7218031819 ॲड करा.